06 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी आदेशानंतरच शाळा-महाविद्यालय बंद

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ अंबोकर यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राज्य शासनाने शाळा-महाविद्यालय ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतू जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालय जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी आदेशानंतरच बंद केली जातील. तोपर्यंत सर्व शाळा-महाविद्यालय सुरू राहतील, अशी माहिती जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी व शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

ओमिक्रोनच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालय ऑनलाईन करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. परंतू कोल्हापूर जिल्ह्यात ओमिक्रोनची रूग्ण संख्या नगन्य असल्याने हे निर्बंध



कोल्हापूर जिल्ह्यात कधी लागू करण्याबाबतचा निर्णय पालकमंत्री सतेज पाटील व कामगारमंत्री मुश्रीफ आणि जिल्हाधिकारीच घेतील. जिल्हा प्रशासन जोपर्यंत शाळा-महाविद्यालय बंद ठेवा, असा आदेश काढत नाही तोपर्यंत जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालय सुरू राहणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालय सूचना देत नाही, तोपर्यंत शाळेत यावे, असे आवाहनही शालेय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### लेखी आदेशानंतरच अधिविभाग, महाविद्यालय बंद

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालये ऑनलाईन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. परंतू जोपर्यंत लेखी आदेश येत नाही तोपर्यंत अधिविभाग व महाविद्यालय सुरू राहतील.

**डॉ. पी. एस. पाटील**
**(प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

जनसंपर्क कक्ष

06 JAN 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

## उदय सामंत यांची माहिती; परीक्षाही ऑनलाईन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता राज्यातील सर्व महाविद्यालये आता १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरू ठेवून परीक्षाही ऑनलाईनच घेतल्या जाणार आहेत. याशिवाय शाळांमधील बाधित विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने औरंगाबाद शहर, रायगड जिल्ह्यातील शाळा बंद करण्यात आल्या आहेत. नागपूर शहर आणि हिंगणा, कामठी, कळमेश्वर सावनेर तालुक्यांमधील शाळाही बंद राहणार आहेत.

उदय सामंत यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, विभागाचे प्रधान सचिव, तंत्रशिक्षण संचालक, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांची ऑनलाईन बैठक घेतली होती. या बैठकीत (पान ८ वर)

### विद्यार्थी, प्राध्यापकांचे लसीकरण आवश्यक

ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण बाकी आहे, त्यांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देऊन त्यांचे



लसीकरण करून घेण्याच्या सूचनाही महाविद्यालये आणि विद्यापीठांना दिल्या आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या काही परीक्षा या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या कला संचालनालयाच्या अखत्यारित येतात. त्यामुळे कला शिक्षण संचालनालयाला त्या परीक्षा ऑनलाईन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

- उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

### शिक्षक व कर्मचाऱ्यांची ५० टक्के उपस्थिती

- विद्यार्थ्यांप्रमाणेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १०० टक्के लसीकरण करून घेण्याची सक्ती महाविद्यालये आणि विद्यापीठांना असणार आहे.
- सोबतच महाविद्यालये आणि विद्यापीठातील उपस्थिती ही ५० टक्केप्रमाणे आणि चक्राकार (रोटेशन) पद्धतीने असावी, असेही निर्णयात नमूद केले आहे.
- विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्रशासकीय कामांसाठी ५० टक्के उपस्थिती आवश्यक असणार आहे.
- ज्यामुळे विद्यार्थी व संस्थेची अडचण होणार नाही, हा त्यामागील उद्देश असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

# राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

(पान १ वरून) जिल्हावार कोविड परिस्थिती काय आहे? किती परीक्षा झाल्या आहेत आणि किती परीक्षा बाकी आहेत? वसतिगृहांची काय परिस्थिती आहे? या सगळ्या बाबींचा आढावा घेतला होता. त्यानंतर बुधवारी १५ फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय सामंत यांनी जाहीर केला.

ऑनलाईन शिक्षणादरम्यान विजेची समस्या, कोरोना संदर्भातील अडचणी, नेटवर्कची अडचण अशा कारणांमुळे जर विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देऊ शकले नाहीत तर त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, याची खबरदारी आणि जबाबदारी विद्यापीठांची असेल, असेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. गोंडवाना, नांदेड, जळगावसारख्या ठिकाणी नेटवर्कची समस्या असल्याने तेथे

### वसतिगृहांना लागणार टाळे

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना आणि पुरेसा वेळ देऊन वसतिगृहे बंद करण्याच्या सूचनाही दिल्या असून, त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, जे विद्यार्थी परदेशातून शिक्षण, संशोधनासाठी आले आहेत, त्यांची पूर्ण काळजी घेऊन त्यांना वसतिगृहात राहण्याची परवानगी मिळणार आहे.

कुलगुरूंनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधत स्थानिक पातळीवर नियोजन करून ऑफलाईन परीक्षा कशा घेता येतील याचा निर्णय घ्यावा, अशा सूचना सामंत यांनी दिल्या आहेत.

06 JAN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोविंदराव सासने यांचे कार्य नव्या पिढीला प्रेरक

## जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात पुस्तक प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गोविंदराव सासनेंसारख्या पुरोगामी समाजसुधारकाचे कार्य 'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तिकेच्या रूपाने पुढे येत आहे. सासने यांचे कार्य आजच्या पिढीला प्रेरक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित पुस्तिकेच्या प्रकाशन कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. 'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तिकेचे प्रकाशन शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. त्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा सुधारणेचा वारसा आणि सासने यांच्या कार्याविषयी विचार मांडले.

डॉ. पवार यांनी अशी चरित्रे अर्वाचीन सामाजिक इतिहासाचे साधन म्हणून महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. इतिहास संशोधन, ऐतिहासिक चरित्राच्या संशोधनातील सूक्ष्म बारकावे याबाबत मार्गदर्शन केले. महर्षी वि. रा. शिंदे, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले. प्रा. अजित सूर्यवंशी, बाळासाहेब सूर्यवंशी, स्वजिता घोडके उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात 'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तिकेचे प्रकाशन शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून अवनीश पाटील, रणधीर शिंदे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

**आठवणींना उजाळा :** प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पाश्चात्य ऐतिहासिक चरित्र लेखनाबाबत विचार व्यक्त केले. डॉ. अवनीश पाटील यांनी कोल्हापूरच्या ऐतिहासिक स्थळांचे, प्रबोधन चळवळींची केंद्रस्थाने जतन करण्याचे तसेच कोल्हापुरातील सामाजिक चळवळी आणि दुर्लक्षित इतिहास नव्याने लोकांसमोर येण्याचे महत्त्व सांगितले.

जनसंपर्क कक्ष
0 6 JAN 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांचा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात प्रारंभ

## ऑनलाईन स्वरूप : वेळापत्रक लवकरच जाहीर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोना, ओमायक्रॉनच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. विविध अभ्यासक्रमांच्या ६६४ परीक्षांचा प्रारंभ फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. त्याचे वेळापत्रक विद्यापीठाकडून पुढील आठवड्यात जाहीर होईल.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून या परीक्षांची तयारी वेगाने सुरू आहे. बीए. बी. कॉम. बी. एस्सी या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सीईटीद्वारे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेल्या अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, लॉ (विधी), एमबीए, आदी अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, त्यासाठीची अंतिम मुदत दि. १५ जानेवारीपर्यंत आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी संगणक प्रणालीची निविदा विद्यापीठाने प्रसिद्ध केली आहे. त्याची अंतिम मुदत दि. १३ जानेवारीपर्यंत आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबत परीक्षा मंडळाने शिक्षकांना सूचना केल्या आहेत. अभ्यासक्रम पूर्ततेची माहिती घेण्यात येत आहे. ती मिळाल्यानंतर वेळापत्रक अंतिम करून ते पुढील आठवड्यात जाहीर केले जाणार आहे.

### प्रथम वर्षाची परीक्षा महाविद्यालय घेणार

पदवीच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय, तर द्वितीय, तृतीय आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा विद्यापीठ घेणार आहे. शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, एमबीए, आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील.

हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होईल. ऑनलाईन स्वरूपात परीक्षा होतील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी अधिविभाग आणि महाविद्यालय पातळीवर अद्यावत करावेत. परीक्षांची तयारी वेगाने सुरू आहे.

**- गजानन पळसे,** प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- हिवाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा : ६६४
- एकूण परीक्षार्थी : २ लाख २० हजार

लोकमत



शिवाजी विद्यापीठात बुधवारी सीएफसीअंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर. के. मुदगल, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सुशील जाधव उपस्थित होते.

# नोबेल लॉरेट घडविण्यासाठी प्रयत्नशील : सोनकवडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटेशन (सीएफसी) सेंटरमधील पृथक्करणाचा वापर करून भविष्यात या विद्यापीठातून नोबेल लॉरेट निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. असे प्रतिपादन 'सीएफसी'चे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ सीएफसी अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. या कार्यशाळेस देशभरातून ३२० हून अधिक विद्यार्थी, शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. भविष्यात असे अनेक नवे विषय घेऊन राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात येतील, असे डॉ. सोनकवडे यांनी सांगितले. संशोधक विद्यार्थी हेच विद्यापीठाच्या संशोधनाचा कणा आहेत. त्यांच्याकडे संशोधन अभिवृत्ती असणे गरजेचे आहे. काहीतरी माहिती करून घेणे हे संशोधन नाही, तर नवीन निर्माण करणे म्हणजे संशोधन असल्याचे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. मुदगल यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी सीएफसी उपकरणे हाताळावीत जेणेकरून कौशल्य प्राप्त होईल, असे संशोधक संचालक डॉ. सी. डी. लोखंडे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करताना कौशल्य विकसित करावीत. विद्यापीठाने विविध प्रकल्प हाती घेऊन ती पूर्णत्वास नेले आहेत. ८५ कोटी इतका निधी संशोधनासाठी आणला आहे. या सर्व प्रकल्पामधून आलेल्या उपकरणाचा उपयोग करून नवउद्योजक निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी डॉ. सुशील जाधव उपस्थित होते.

0 6 JAN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


गुड न्यूज : उद्यान विभागाचे पाऊल; औषधी वनस्पतींचा समावेश

# शिवाजी विद्यापीठाची रोपवाटिका शोभिवंत वृक्षांनी फुलणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने पाण्याबाबत जलस्वयंपूर्णता प्राप्त केल्यानंतर आता रोपवाटिका आणखी संपन्न करण्याचे पाऊल टाकले आहे. नव्या वर्षात विद्यापीठाच्या रोपवाटिकेत स्थानिक वाणांची मोठ्या वृक्षांची रोपे आणि शोभिवंत वृक्षांची बगीच्यात लागवड करण्यासाठीची रोपे मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येतील.

विद्यापीठाचा परिसर ऑक्सिजन पार्क म्हणून ओळखला जातो. येथे याच कारणासाठी फिरावयास येणाऱ्या लोकांची गर्दी असते. कोविडमुळे केवळ सकाळी फिरण्यासाठी हा परिसर खुला असतो. निसर्गसंपन्न विद्यापीठात नव्याने करावयाच्या वृक्षलागवडीसाठी रोपे तयार करण्यासाठी रोपवाटिका सुरू केली. या रोपवाटिकेत शोभिवंत वृक्षांची रोपे उपलब्ध करून देण्यास सुरूवात केली आहे. या रोपवाटिकेत जास्वंद, देशी गुलाब, रातराणी, कामिनी अशा विविध फूलझाडांची निर्मिती मोठ्या प्रमाणात करण्यात येते. त्याचप्रमाणे विविध क्रोटॉन्स, औषधी वनस्पती यांचीही रोपे बनविली जात आहेत. पुढील वर्षात गणेशोत्सवामध्ये जास्वंदीची, तुळशी विवाहानिमित्त तुळशीची रोपे उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. वटसावित्री पौर्णिमेला वडाच्या फांद्यांची पूजा करण्यात येते. मात्र, त्याऐवजी वडाच्या रोपाची पूजा करता यावी यासाठी एक हजार वटवृक्षाची रोपे उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.



रोपवाटिकेत स्थानिक वाण व शोभिवंत वृक्षांची रोपे उपलब्ध केली जाणार आहेत. उद्यान विभागाकडून तयारी सुरू आहे.

> विद्यापीठाची रोपवाटिका सक्षम करण्यामागे स्थानिक वाणाचा प्रसार व्हावा हा मुख्य हेतू आहे. विविध कारणांने होणारी वृक्षांची हानी टाळण्यासाठी जास्वंद, तुळशी, वटवृक्ष रोपांची निर्मिती करून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध करून देण्यात येतील. फांदी तोडून त्याची पूजा करण्याऐवजी रोपांची पूजा करावी आणि नंतर ते रोप लावावे अशी अपेक्षा आहे. त्यातून वृक्षाविषयी आवड आणि नकळत वृक्षप्रसार व्हावा असा हेतू आहे.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,** उपकुलसचिव, उद्यान विभाग

### रोपे मिळणार माफक दरात

फर्न, कोलियस, डेझी, निशिगंध, जरबेरा, शेवंती, झेनिया, ब्राम्ही, शतावरी, जिरेनियम, तुतू, ग्लॅडिओलस, ॲस्टर, बिगोनिया, जास्वंद, बोगनवेल, कर्दळ, आदींची रोपे मोठ्या प्रमाणात तयार करण्यात आली आहेत. चिंच, बहावा, पिंपरण, वड, उंबर, पिंपळ, आंबा, कांचन, आपटा, कडुनिंब अशा विविध वृक्षांची रोपेही तयार केली आहेत. ही रोपे माफक दरामध्ये लोकांनाही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 6 JAN 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांकडे संशोधन अभिवृत्ती हवी

## कुलगुरू डॉ. मुदगल; विद्यापीठातील कार्यशाळेचा समारोप



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सैफ सेंटरमधील कार्यशाळेचा समारोप बुधवारी झाला. या वेळी कुलगुरू डॉ. आर. के. मुदगल, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. जाधव आदी.**

**कोल्हापूर, ता. ५ :** विद्यार्थ्यांमधील संशोधन अभिवृत्तीच त्यांना संशोधन करण्यासाठी प्रवृत्त करते. काही तरी माहिती करून घेणे किंवा माहिती करून देणे म्हणजे संशोधन नसून नवनिर्मिती करणे म्हणजे संशोधन आहे, असे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. मुदगल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

देशातील ३२० हून अधिक विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी होते. सेंटरमधील पृथ्थकरणाचा वापर करून भविष्यात विद्यापीठातून नोबेल पारितेषिक मिळवण्याची क्षमता असणारे विद्यार्थी घडतील. अशाच प्रकारची कार्यशाळा घेऊ, असा विश्वास सैफ सेंटरचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी व्यक्त केला.

डॉ. मुदगल म्हणाले, ''संशोधक विद्यार्थी हेच संशोधनाचा कणा आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांकडे संशोधन अभिवृत्ती असणे गरजेचे आहे. काहीतरी माहिती करून घेणे हे संशोधन नाही तर नवीन निर्माण करणे म्हणजे संशोधन ही भावना संशोधक विद्यार्थ्यांनी पक्की करावी.''

संशोधक संचालक डॉ. सी. डी. लोखंडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी सीएफसीतील उपकरणाविषयी माहिती घेण्यासह ती हाताळावीत जेणेकरून उपकरणाचे कौशल्य प्राप्त होईल.''

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी कौशल्य विकसित करायला पाहिजे. आज विद्यापीठाने विविध प्रकल्प हाती घेऊन ती पूर्णत्वास नेले आहेत. जवळपास ८५ कोटी इतका निधी संशोधनासाठी आणला आहे. या सर्व प्रकल्पामधून आलेल्या उपकरणाचा उपयोग करून नवउद्योजक निर्माण होतील.''